महाराष्ट्र शासन

राष्ट्रोध्दाराय तंत्र शिक्षणम्

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

४१२, ई, शिवाजीनगर, पुणे-४११ ०१६.

Email ID: ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र. : तंशिविकापु/आस्था-३(अ)/महाराष्ट्र भूषण/२०२५/ 1742 दिनांक : 01 APR 2021

**तातडीचे**

प्रति,

संचालक/प्राचार्य/उपसचिव,
सर्व शासकीय संस्था/कार्यालये

**विषय :- महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान करणेबाबत.....**

संदर्भ :- संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्र. १२/ आस्था(२)/२०२१/महाराष्ट्रभूषण/४५३, दिनांक ----

उपरोक्त विषयान्वये या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय संस्थांना कळविण्यात येते की, संदर्भीय संचालनालयाच्या पत्राचे व शासन पत्राचे अवलोकन करण्यात येवून सोबत जोडलेल्या विहित विवरणपत्रात माहिती सादर करण्यात यावी. सदरची माहिती दिनांक **०५ एप्रिल २०२१ पर्यंत** या कार्यालयास **est.ropune@gmail.com** या ई-मेल आयडीवर पाठवावी.

1/4/2021

(डॉ. वि. श्री. बांदल)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

**सोबत : संदर्भीय पत्र, शासन निर्णय आणि विवरणपत्र**

प्रत : प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेसाठी.

तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

महाराष्ट्र भूषण पुरस्कार

प्राप्त शिफारशीचे विवरणपत्र

| अ.क्र. | महराष्ट्र भूषण पुरस्कारासाठी प्राप्त मान्यवराचे नाव | शिफारस करणारी व्यक्ती / संस्था | मान्यवरांचे जन्मदिनांक व वय | मान्यवरांचे कार्यक्षेत्र | मान्यवर किती वर्षापासून या क्षेत्रात कार्यरत आहेत. | मान्यवरांचे विशेष कार्य | मान्यवरास मिळालेले पुरस्कार / सन्मान (असल्यास) | महाराष्ट्र किमान १५ वर्ष वास्तव्य आहे काय. | मान्यवर पद्म पुरस्काराने सन्मानित आहेत काय, असल्यास तपशिल | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४००००१
दूरध्वनी क्रमांक - ०२२-६८५९७४७८/४१२/४६३/४३१
E-mail :- desk12@dtemaharashtra.gov.in internet :- http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : १२/आस्था(२)/२०२१/ महाराष्ट्र भूषण/४५२ दिनांक :

प्रति,
१. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर
२. सचिव,
महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई

**विषय : महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान करणेबाबत..**
संदर्भ : शासन पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे पत्र क्र. मभूपु १२२०/प्र.क्र.१६८/सां का ४, दि.१८.०१.२०२१ व ०८.०२.२०२१ तसेच शासन निर्णय क्र. मभूपू २०१२/ सुनिठ/ प्र.क्र.१४३/ सां.का.४, दि. ०१.०९.२०१२ व २७.०५.२०१४

उपरोक्त विषयाची संदर्भाधीन पत्रे व शासन निर्णय पहावेत. त्वरित संदर्भासाठी प्रत सोबत जोडली आहे.

संदर्भाधीन शासन निर्णयातील तरतूदीं व महाराष्ट्र भूषण पुरस्कार योजनेचे नियम, अटी व शर्तीनुसार आपल्या अधिनस्त संस्था/ कार्यालयातील कर्मचाऱ्यांची माहिती विहित विवरणपत्रामध्ये आपल्या शिफारशीसह सादर करावी.

(प्रमोद नाईक)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई

आस्था ३ क्र
(३)
१/४/२१

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
01 APR 2021
3021

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
मंत्रालय (विस्तार), दालन क्र. ५२१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई -४०००३२

दूरध्वनी क्र. Email ID : tca-mh@nic.in

स्मरणपत्र - १.

क्रमांक : मभूपु १२२०/प्र.क्र.१६८/सां.का.४ दिनांक : ०८ फेब्रुवारी, २०२१

प्रति,

अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

विषय :- महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान करणेबाबत.

संदर्भ :- १) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्र. मभुपु १०९५/१३८७७/प्र.क्र.१०१/कार्या.१, दिनांक १९ ऑगस्ट, १९९५

२) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. मभुपू २०१२/सुनिठ/ प्र.क्र.१४३/सां.का.४, दिनांक १ सप्टेंबर, २०१२ व शासन निर्णय समक्रमांक दिनांक २७ मे, २०१४

३) या विभागाचे समक्रमांकाचे पत्र दि.१४ जानेवारी, २०२१.

महोदय,

उपनिर्दिष्ट क्र. ३ येथील पत्रान्वये उपरोक्त विषयाबाबत योग्य व्यक्तींची नावें आणि त्यांच्या कार्याची माहिती याबाबतचा अहवाल या विभागाकडे हे पत्र निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत सत्वर पाठविण्याबाबत विनंती करण्यात आली होती. सदरची माहिती अद्याप अप्राप्त आहे. सबब विषयांकित माहिती या विभागास सत्वर उपलब्ध करुन द्यावी, ही विनंती.

(विलास स. थोरात)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
मंत्रालय (विस्तार), दालन क्र. ५३१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई -४०००३२

दुरध्वनी क्र.                                                                Email ID : tca-mh@nic.in

---

तात्काळ                                                                दिनांक : १८ जानेवारी, २०२१

क्रमांक : मभूपु १२२०/प्र.क्र.१६८/सां.का.४

प्रति,

आपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

विषय :- महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान करणेबाबत.

संदर्भ :- १) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्र. मभूपु १०९५/१३८७७/प्र.क्र.१०१/कार्या.१, दिनांक १९ ऑगस्ट, १९९५

२) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. मभुपू २०१२/सुनिठ/ प्र.क्र.१४३/सां.का.४, दिनांक १ सप्टेंबर, २०१२

महोदय,

उपरनिर्दिष्ट क्र. १ येथील शासन निर्णयान्वये महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान करण्याची योजना राबविण्यात येते. महाराष्ट्र भूषण हा महाराष्ट्रातील सर्वोच्च नागरीक सन्मान असल्यामुळे हा पुरस्कार देताना कोणत्याही क्षेत्रात निरपेक्ष वृत्तीने सेवा करणाऱ्या तसेच त्याद्वारे मानवी जीवन उंचावण्यासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीचा विचार करण्यात येतो. तसेच तो मरणोत्तर दिला जात नसल्याने केवळ हयात असलेल्या मान्यवरांच्या नावांचाच या पुरस्काराकरिता विचार केला जातो. उपरनिर्दिष्ट क्र. २ येथील शासन निर्णयान्वये सदर पुरस्कार योजनेची सुधारीत नियमावली जाहीर करण्यात आलेली आहे (प्रत शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे). त्यानुसार सदर पुरस्कारासाठी आपल्या विभागामार्फत सुयोग्य मान्यवरांची शिफारस करावयाची असल्यास ती सोबत जोडलेल्या नमून्यातील विवरणपत्रात, शिफारशीच्या पुष्ठ्यर्थ संबंधित कागदपत्रांसह, कोणत्याही परिस्थितीत दि. ४ फेब्रुवारी, २०२१ पर्यंत या विभागाकडे पाठविण्यात यावी, ही विनंती. विवरणपत्रातील माहितीची आपल्या विभागाने खातरजमा केल्याचेही कृपया प्रमाणित करण्यात यावे.

आपला,
(सही)

सहपत्र : वरील प्रमाणे

(विलास रा. थोरात)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र भूषण पुरस्कार

प्राप्त शिफारशींचे विवरणपत्र

| अ.क्र. | महाराष्ट्र भूषण पुरस्कारासाठी प्राप्त मान्यवरांचे नाव | शिफारस करणारी व्यक्ती/संस्था | मान्यवरांचे जन्म दिनांक व वय | मान्यवरांचे कार्यक्षेत्र | मान्यवर किती वर्षापासून या क्षेत्रात कार्यरत आहेत | मान्यवरांचे विशेष कार्य | मान्यवरास मिळालेला पुरस्कार/सन्मान (असल्यास) | महाराष्ट्रात किमान १५ वर्षे वास्तव्य आहे काय | मान्यवर पद्म पुरस्काराने सन्मानित आहेत काय, असल्यास तपशिल | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

## परिशिष्ट "अ"

## महाराष्ट्र भूषण पुरस्कार योजनेचे नियम, अटी व शर्ती

(शासन निर्णय क्र.मभूपु २०१२/सुमिठ/प्र.क्र.१४३/सां.का.४, दिनांक : १ सप्टेंबर, २०१२ चे परिशिष्ट)

उद्दिष्ट :- महाराष्ट्र राज्यात कोणत्याही क्षेत्रात निरपेक्ष वृत्तीने सेवा करणाऱ्या तसेच त्याद्वारे मानवी जीवन उंचावण्यासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीस महाराष्ट्र भूषण हा राज्याचा सर्वोच्च पुरस्कार देऊन सन्मानित करणे.

पुरस्कारासाठी पात्रता व निकष :-

१. संबंधित व्यक्तीने त्याच्या क्षेत्रात किमान २० वर्षे सातत्याने सेवाभावी वृत्तीने लक्षणीय वैशिष्ट्यपूर्ण/ उल्लेखनीय कार्य केलेले असावे. मात्र संशोधनाद्वारे कोणत्याही क्षेत्रात नवीन शोध लावलेला असल्यास तसेच क्रिडा क्षेत्रात अव्वल दर्जाचे अनेक पुरस्कार प्राप्त खेळाडूंच्या बाबतीत विचार करुन हा नियम शिथिल करण्यात येईल.
२. सदर व्यक्तीचे महाराष्ट्रात किमान १५ वर्षे वास्तव्य असावे.
३. पद्मपुरस्कार प्राप्त मान्यवरांना सदर पुरस्कारासाठी प्राधान्य देण्यात येईल.

पुरस्काराचे स्वरुप :-

१. या पुरस्काराची रक्कम रु. १० लाख इतकी असेल.
२. पुरस्कारार्थीला मानचिन्ह आणि स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येईल.

निवड समिती :- पुरस्कारासाठी शासनाने नियुक्त केलेल्या निवड समितीचे सदस्य खालीलप्रमाणे असतील.

| | | |
|---|---|---|
| शासकिय सदस्य - | १. मा. मुख्यमंत्री | अध्यक्ष |
| | २. मा. उपमुख्यमंत्री | उपाध्यक्ष |
| | ३. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य | सदस्य |
| | ४. मा. राज्यमंत्री, सांस्कृतिक कार्य | सदस्य |
| | ५. अपर मुख्य सचिव, सांस्कृतिक कार्य | सदस्य |
| | ६. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय | सदस्य सचिव |

अशासकीय सदस्य - पाच अशासकीय सदस्य हे तीन वर्षासाठी नियुक्त करण्यात येतील व दर तीन वर्षानंतर किंवा समितीची पुनर्रचना होईपर्यंत समिती सदस्य म्हणुन कार्यरत राहतील.

सद्य:स्थितीत दि.४ जुलै २०११ च्या शासन निर्णयान्वये खालील प्रमाणे अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

| | |
|---|---|
| १. श्रीमती स्नेहलता देशमुख | सदस्य |
| २. श्री. चंदू बोर्डे | सदस्य |
| ३. श्री. कुमार केतकर | सदस्य |
| ४. श्री. रघुनाथ माशेलकर | सदस्य |
| ५. श्री. यु. म. पठाण | सदस्य |

सदर समितीस विविध क्षेत्रातील प्राप्त शिफारशी सादर करण्यात येतील व समिती याबाबत अंतिम निर्णय घेईल.

* * * * * * * *

- 0 JUN 2014
836

महाराष्ट्र भूषण पुरस्कार योजनेच्या सुधारीत नियमावलीत नवीन अटींचा समावेश करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शासन निर्णय क्र. मभूपु २०१२/सुनिठ/प्र.क्र.१४३/सां.का.४
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २७ मे, २०१४

वाचा :- या विभागाचा समक्रमांकाचा दि. १ सप्टेंबर, २०१२ चा शासन निर्णय

प्रस्तावना :- "महाराष्ट्र भूषण" पुरस्कार हा राज्याचा सर्वोच्च पुरस्कार असून सर्व क्षेत्रातील उच्चतम कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा या पुरस्कारासाठी विचार करण्यात येतो. या पुरस्कार योजनेतील पूर्वीचे सर्व शासन निर्णय निरसित करुन सुधारीत नियमावली संदर्भाधीन शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आली आहे. या नियमावलीमध्ये नवीन बाबी समाविष्ट करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :- महाराष्ट्र भूषण पुरस्कारासाठी पुरस्कार्थी निवडण्यासंदर्भात दि. २ डिसेंबर, २०१३ रोजी झालेल्या पुरस्कार निवड समितीच्या बैठकीत पुरस्काराच्या नियमावलीमध्ये काही बाबी नव्याने समाविष्ट करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. त्यानुसार सदर शासन निर्णयान्वये पुढील नवीन अटींचा नियमावलीत समावेश करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१. महाराष्ट्र भूषण हा पुरस्कार मरणोत्तर प्रदान करण्यात येणार नाही.

२. या पुरस्कारासाठी पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाकडे प्राप्त होणाऱ्या शिफारशींची विभाग स्तरावर छाननी करण्यासाठी छाननी समिती गठीत करण्यात यावी व सदर छाननी समितीने प्राप्त शिफारशींची छाननी करुन त्यामधून मान्यवरांची एक निवडसूची तयार करुन ती निवड समितीपुढे सादर करावी. तसेच छाननीअंती निवड सूचीत समाविष्ट न केलेल्या शिफारशींची एक स्वतंत्र यादी निवड समितीच्या अवलोकनार्थ सादर करण्यात यावी.

३. त्यास अनुसरुन महाराष्ट्र भूषण पुरस्कारासाठी प्राप्त शिफारशींची छाननी करण्यासाठी खालीलप्रमाणे छाननी समिती स्थापन करण्यात येत आहे.

यासाठी संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना अथवा त्यांनी घोषित केलेल्या दुय्यम अधिकाऱ्यास या संबंधीच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

यासाठी होणारा खर्च हा मागणी क्र. झेडडी-२, प्रधान लेखाशिर्ष २२०५ कला व संस्कृती, १०२ कला व संस्कृती यांचे प्रचालन, (०४) (०१) इतर महोत्सव (२२०५ १६०५) ५० इतर खर्च या लेखाशिर्षाखाली उपलब्ध अर्थसंकल्पिय तरतुदीतून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर उपलब्ध केला असून त्याचा संगणक संकेतांक २०१२०९०३११५४०४२७०० आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( गीता प. कुलकर्णी )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
२. मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
३. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव
४. मा. राज्यमंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव
५. महाराष्ट्र भूषण पुरस्कार समितीचे सर्व अशासकीय सदस्य
(संचालनालयामार्फत पत्राने)
६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे उपसचिव
७. अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग
८. अप्पर मुख्य सचिव, सांस्कृतिक कार्य, मंत्रालय, मुंबई
९. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
१०. संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई
११. संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय, मुंबई
१२. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई
१३. संचालक, पुराभिलेख संचालनालय, मुंबई
१४. प्रकल्प संचालक, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई
१५. सचिव, दर्शनिका विभाग, मुंबई
१६. सचिव, रंगभूमी परिनिरीक्षण मंडळ, मुंबई
१७. सर्व उपसचिव / अवर सचिव / कार्यासन अधिकारी, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग.
१८. निवड नस्ती (सां.का.४)

प्रत - १६५१ - १७

महाराष्ट्र भूषण पुरस्कार योजनेची
सुधारीत नियमावली तयार करणेबाबत

महाराष्ट्र शासन
शासन निर्णय क्र. मभूपु २०१२/सुनिठ/प्र.क्र.१४३/सां.का.४
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ६ सप्टेंबर, २०१२

वाचा :- १) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग
क्र. मभूपु १०९५/१३८०७/प्र.क्र.१०१/सां.का.१, दि. १९ ऑगस्ट, १९९५
२) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग
क्र. मभूपु १०९८/प्र.क्र.२७४/सां.का.१, दि. २ जुलै, १९९९
३) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग
क्र. मभूपु २००३/प्र.क्र. २२८/सां.का.१, दि. २३ एप्रिल, २००३

प्रस्तावना :- देशात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्तीस ज्याप्रमाणे पद्मपुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते, त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्यात एखाद्या क्षेत्रामध्ये उच्चतम कामगिरी करणाऱ्या व्यक्तीचा सन्मान करण्यासाठी महाराष्ट्र भूषण पुरस्कार देण्याची योजना सन १९९५ या सालापासून सुरु करण्यात आली आहे. या पुरस्कार योजनेतील अटी- शर्तीबाबतच्या नियमावलीमध्ये कालानुरुप योग्य ते बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :- त्याअर्थी महाराष्ट्र भूषण पुरस्कार योजनेचे यापूर्वीचे सर्व शासन निर्णय निरसित करुन, प्रस्तुत शासन निर्णयान्वये नवीन अटी-शर्तीबाबतची नियमावली तयार करण्यात आली असून

पृष्ठ १०९/८

२

| | | |
|---|---|---|
| १. | उप सचिव (सां.का.) | अध्यक्ष |
| २. | संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय | सदस्य |
| ३. | अवर सचिव, (सां.का. ४) | सदस्य |
| ४. | सहसंचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय | सदस्य सचिव |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( गीता रा. कुलकर्णी )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
२. मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
३. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव
४. मा. राज्यमंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव
५. महाराष्ट्र भूषण पुरस्कार समितीचे सर्व अशासकीय सदस्य
(संचालनालयामार्फत पत्राने)
६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे उपसचिव
७. अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग
८. अप्पर मुख्य सचिव, सांस्कृतिक कार्य, मंत्रालय, मुंबई
९. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
१०. संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई
११. संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय, मुंबई
१२. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई
१३. संचालक, पुराभिलेख संचालनालय, मुंबई
१४. प्रकल्प संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई
१५. सचिव, दर्शनिका विभाग, मुंबई
१६. सचिव, रंगभूमी परिनिरीक्षण मंडळ, मुंबई
१७. सर्व उपसचिव / अवर सचिव / कार्यासन अधिकारी, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग.
१८. निवड नस्ती (सां.का.४)